महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३,     मुंबई, दिनांक २१/०७/२०२३

**परिपत्रक -**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शा.नि.क्र.पोलीस-१८२०/प्र.क्र.१३५(दुय्यम नस्ती)/पोल-५ अ, दिनांक १८ जुलै, २०२३.

**विषय :-** महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उप निरीक्षकांची २५६ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र. शा.नि.क्र. पोलीस-१८२०/प्र.क्र.१३५(दुय्यम नस्ती) / पोल-५ अ, दिनांक १८ जुलै,२०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०७१८१८०४३७२२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

२१/०७/२०२३

( सुनिता चौधरी )
कार्यालय अधीक्षक,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ५

प्रत,

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.



Scanned with CamScanner

**महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उप निरीक्षकांची २५६ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पोलीस-१८२०/प्र.क.१३५(दुय्यम नस्ती)/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १८जुलै,२०२३

वाचा :-

१) अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/५/१०/पोउपनि-मविस्पप-२०२१/११/२०२२, दि.२२.०४.२०२३

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६

प्रस्तावना:-

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा - २०२१ मधून शिफारसपात्र ठरलेले २५० उमेदवार तसेच सन २००६,२००७ व २०१६ मधील पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षेमधील आरक्षणाचा विचार न केल्यास गुणवत्तेनुसार गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट होत असलेले मा. न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार प्रशिक्षणास पाठवावयाचे ४ उमेदवार, मागील प्रशिक्षण सत्रामध्ये मुदतवाढ घेतलेले ०१ आणि पोलीस उपनिरीक्षक मर्यादीत विभागीय परीक्षा-२०११ मधील न्यायालयीन प्रकरणामधुन दोषमुक्त झालेले ०१ उमेदवार असे एकुण २५६(२५०+४+१+१) उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदाचे ०९ महिने कालावधीचे प्रशिक्षण महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षण सत्र क्र.१२३ मध्ये दि.०३.०४.२०२३ पासून सुरु करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षाणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्याकरीता महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरीक्षकांची २५६ अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा - २०२१ मधून शिफारसपात्र ठरलेले २५० उमेदवार. तसेच सन २००६,२००७ व २०१६ मधील पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय परीक्षेमधील आरक्षणाचा विचार न केल्यास गुणवत्तेनुसार गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट होत असलेले मा. न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार प्रशिक्षणास पाठवावयाचे ४ उमेदवार, मागील प्रशिक्षण सत्रामध्ये मुदतवाढ घेतलेले ०१ आणि पोलीस उपनिरीक्षक मर्यादीत विभागीय परीक्षा-२०११ मधील न्यायालयीन प्रकरणामधुन दोषमुक्त झालेले ०१ उमेदवार असे एकुण

Scanned with CamScanner

२५६(२५०+४+१+१) प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर दि.०३.०४.२०२३ ते दि.०२.०१.२०२४ या कालावधीसाठी पोलीस उपनिरीक्षकांची २५६ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पदे विविध पोलीस घटकांमध्ये पोलीस उपनिरीक्षकांच्या रिक्त असलेल्या पदांच्या अधिनतेने निर्माण करण्यात आली असल्याने ही पोलीस उप निरीक्षकांची रिक्त पदे ज्या आस्थापनेवर आहेत त्या आस्थापनेवर वेतन काढले जाणार नाही याची खात्री करण्यात यावी.

३. याकरीता होणारा खर्च वित्तीय वर्ष सन २०२३-२४ साठी " मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस, १०९ जिल्हा पोलीस दल, (००) (०१) जिल्हा पोलीस बल" या लेखाशिर्षाखाली संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांना मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.२ येथील वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१,दिनांक २०.०२.२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०७१८१८०४३७२२२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAIKWAD
GANESH SUDAM

Digitally signed by GAIKWAD GANESH SUDAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=f88a2df366dbf702eda9179bfdd100f151490e691798947c7f6d1b8cf0dab7d6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0585EFA444AE7B29EC4D54E290F9F826C6E4DE96799148FCFC4C6E13F203834E, cn=GAIKWAD GANESH SUDAM
Date: 2023.07.18 18:06:26 +05'30'

( गणेश गायकवाड )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना/प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१, मुंबई



Scanned with CamScanner

७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
१०. निवडनस्ती (पोल-५अ)



Scanned with CamScanner